IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महाराष्ट्र विधानसभा राखीव मतदार संघातील राजकीय नेतृत्वाचा अभ्यास

[1]डॉ.राजेंद्र सुभाष नाडेकर, [2]शिंदे भगवान अशोक
भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ
कला व वाणिज्य महाविद्यालय मखमलाबाद नाशिक

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

महाराष्ट्र विधानसभा

**ABSTRACT**

आज जगातील 90 टक्के देशानी लोकशाही व्यवस्था स्विकारलेली आहे. राष्ट्र स्वतःला लोकशाही राष्ट्र म्हणून घेत आहेत. लोकशाही मूल्यांनमध्ये समता, स्वतंत्र्य व बंधुता हे मुल्य लोकशाहीमध्ये जपले जातात.आरक्षणाचा उद्देश समता प्रस्थापित करणे हा असतोहे सर्वमान्य झाले आहे. भारतामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी शाहु फुले,आंबेडकरांचे योगदान महत्वाचे आहे. भारतीय लोकशाहीच्या वैशिष्ठांपैकी आरक्षण महत्वाचे मानले जाते. भारतीय घटनाकारांनी आर्थिक, सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेपणाचा विचार करून देशातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी राखीव जागेचे धोरण स्वीकारले. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वात मोठा प्रश्नविकासाचा होता. भारतासारख्या राष्ट्रात जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था बहुभाषिकता आणि विषम अशी प्रादेशिकता मोठ्या प्रमाणात होती.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 7%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Nadekar, R. S., & Shinde, B. A. (2025). महाराष्ट्र विधानसभा राखीव मतदार संघातील राजकीय नेतृत्वाचा अभ्यास. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), 285–289.

## प्रस्तावना (Introduction)

आज जगातील 90 टक्के देशानी लोकशाही व्यवस्था स्विकारलेली आहे. राष्ट्र स्वतःला लोकशाही राष्ट्र म्हणून घेत आहेत. लोकशाही मूल्यांनमध्ये समता, स्वतंत्र्य व बंधुता हे मुल्य लोकशाहीमध्ये जपले जातात.आरक्षणाचा उद्देश समता प्रस्थापित करणे हा असतोहे सर्वमान्य झाले आहे. भारतामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी शाहु फुले,आंबेडकरांचे योगदान महत्वाचे आहे. भारतीय लोकशाहीच्या वैशिष्ठांपैकी आरक्षण महत्वाचे मानले जाते. भारतीय घटनाकारांनी आर्थिक, सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेपणाचा विचार करून देशातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी राखीव जागेचे धोरण स्वीकारले. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वात मोठा प्रश्नविकासाचा होता. भारतासारख्या राष्ट्रात जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था बहुभाषिकता आणि विषम अशी प्रादेशिकता मोठ्या प्रमाणात होती.

ऐतिहासिक व सांस्कृतिक मागासवर्गीयांना विशेष संधी देऊन त्यांना राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याची व्यवस्था केली. कलम 38(2) प्रमाणे शासन विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न करेल. अशी तरतूद केलेली आहे. घटनेतील सोळाव्या भागात कलम 330 ते 342 अंतर्गत विविध आरक्षण विषयक तरतुदी केल्या आहेत."स्वातंत्र्य समता व सामाजिक न्याय यासाठी आरक्षण देण्याची आवश्यकता नाही." या निर्णयावर बरीच चर्चा झाली होती. यावर राष्ट्रपती के आर नारायण यांनी घटनेतील 84 व्या कलमात दुरुस्तीचे संसदेच्या दोन्ही सभागृहांना आव्हान करून आरक्षण धोरण चालू ठेवावे असे सुचवले.

भारतात दोन प्रकारची मतदान पद्धती स्वीकारण्यात आली आहे.एक सर्वसाधारण निवडणूक पद्धती ज्यात सर्व नागरिक कोणत्याही प्रकारची जात, धर्म, भाषा, वंश, लिंग अशा प्रकारच्या भेदभावाशिवाय निवडणूक पद्धती होय. या पद्धतीत फक्त अनुसूचित जाती व जमातीचेच नागरिक निवडणूक लढवू शकतात. मागास जाती व जमातींना देशाच्या राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी या जाती व जमाती करिता खास अशी आरक्षण निवडणूक मतदान पद्धती आवश्यक मानली आहे. भारतीय संविधानकारांनी राजकीय आरक्षण धोरण स्वीकारत असताना सामाजिक न्यायाचे तत्त्व समोर ठेवले होते. ते उद्दिष्टे खरोखरच साकार झाले का? आरक्षण धोरणाचा फायदा मागास जाती व जमातीचा विकास होण्याच्या दृष्टीने झाला आहे का? राजकीय प्रक्रियेतील घटक राजकीय पक्ष, समाज आणि वृत्तपत्रे या सर्व घटकांनी व्यापक दृष्टीने राजकीय आरक्षण स्वीकारले आहेत का? मागास जातीचे प्रतिनिधि मागास जातीच्या विकास प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात का? राजकीय आरक्षण धोरणाचे तटस्थपणे परीक्षण होणे राष्ट्रीय एकात्मतेच्या आणि राष्ट्रीय जीवनातील सामंजस्य यांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. न्यायाचे पालन झाल्याने केवळ भागत नाही. त्याचे पालन झाले आहे हे दिसलेही पाहिजे या दृष्टीने राजकीय आरक्षण धोरणाची आजच्या एकंदर सामाजिक परिस्थितीत तटस्थपणे मूल्यमापन होणे पुरेसे नाही, तर आवश्यक ती कार्यवाही होत असल्याचे सर्व संबंधितांना पटले पाहिजे. या सर्व पार्श्वभूमीवर आधारित अभ्यास करणे हा संशोधनाचा हेतू आहे.

नासिक जिल्ह्यात लोकसभेचे दोन मतदारसंघ आहेत एक मतदारसंघ राखीव आहे व एक खुला आहे. नाशिक जिल्ह्यात विधानसभेचे 12 मतदारसंघ आहेत त्यापैकी चार राखीव आहेत व आठ खुले आहेत.नाशिक लोकसभा मतदारसंघांमध्ये सिन्नर, नाशिक पूर्व, नाशिक मध्य, नाशिक पश्चिम, देवळाली व इगतपुरी असे सहा

विधानसभा विभागाचा समावेश आहे. त्यापैकी देवळाली एसटीसाठी तर इगतपुरी एसटीसाठी राखीव आहे. दिंडोरी लोकसभा मतदारसंघांमध्ये नांदगाव, कळवण, चांदवड,येवला, निफाड आणि दिंडोरी हे सहा विधानसभा विभाग येतात त्यापैकी कळवण आणि दिंडोरी एसटी साठी राखीव आहेत. तर नाशिक जिल्ह्यातील विधानसभा तीन एसटी आणि एक एसटीसाठी राखीवआहे.

**उद्दिष्टे:-**

1) महाराष्ट्र विधानसभा मतदारसंघातील राजकीय व जातीय रचना अभ्यासणे.

2) राखीव मतदार संघातील पक्षांच्या उमेदवारी संदर्भात पक्षाची ध्येयधोरणे अभ्यासणे.

3) राखीव मतदार संघातील निवडणूक प्रक्रियांचा अभ्यास करणे

**राखीव मतदार संघांचा ऐतिहासिक आणि राजकीय महत्त्व**

जगातील सर्वच राष्ट्र आज प्रगती करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. प्रत्येक देशाची प्रगती ही कोणत्या पद्धतीने होत आहे. याचाही विचार करणे आज आवश्यक ठरते. कोणत्याही देशाच्या विकासात्मक धोरणाचे मुल्यांकन करताना सर्वप्रथम आधार घ्यावा लागतो. तो देशाने स्वीकारलेल्या राज्यसंस्थेचा विचार प्रणालीचा या विचार प्रणालीच्या आधारावरच त्या राष्ट्राचा दर्जा जगासमोर येताना दिसून येतो. या दृष्टीने भारताच्या विकासात्मक कार्याचे मूल्यांकन करताना आपल्याला विचार करावा लागतो. तो या देशाने स्वीकारलेल्या लोकशाही व्यवस्थेचा भारताने लोकशाहीद्वारे आज समाज परिवर्तन साधण्यावर भर दिला आहे. लोकशाहीतच लोकांच्या आशाअपेक्षांचा विचार होऊ शकतो. यातूनच लोक आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न करतात. या भूमिका मांडण्यासाठी समाजातील काही लोक पुढे येतात. या लोकांनाच लोकशाहीत नेतृत्वाचा दर्जा प्राप्त होतो. लोकशाहीतच नेतृत्वाविषयी लोकांच्या सकारात्मक व नकारात्मक भूमिका तयार होऊ शकतात. या दृष्टीने लोकशाही विकासासाठी व देशाच्या विकासासाठी सक्षम नेतृत्व असणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून भारताच्या विकासाचे विचार मंथन करताना या विकासात सहभागी झालेले नेतृत्व, विकास व विकासाच्या आधारे होणारे लोककल्याण, यासंदर्भात आज प्रगल्भतेने विचार करणे आवश्यक आहे.

आज नव्याने विकसित झालेल्या वंचित घटकांचा अभ्यास हा सामाजिक शास्त्र अंतर्गत एक महत्त्वाचा विचारप्रवाह बनला आहे. आरक्षण हा सामाजिक शास्त्रातील एक महत्त्वाचा अभ्यास विषय मानला गेला आहे. राज्यशास्त्रात राजकीय प्रक्रियेच्या अनुषंगाने आरक्षणाचा अभ्यास अनेक अभ्यासकांनी केला आहे. राखीव मतदारसंघ व त्याच्या विकासाबाबत ही जिज्ञासा व कुतूहल युवकांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळून येते. राजकीय आरक्षणाची संकल्पना ही पुर्वीपासूनच भारतीय राजकारणात व समाजकारणात विवादास्पद राहिलेली आहे. वर्ण व जातीवर आधारलेल्या भारतीय समाज समाज व्यवस्थेत कनिष्ठ जातीचे सतत शोषण झाल्यामुळे त्यांना विकासाच्या संधीपासून वंचित रहावे लागले. त्यामुळे अशा दुर्बल समाजातील व्यक्तीच्या विकासासाठी राज्यघटनेने काही तरतुदी केल्या आहेत. निवडणूक राजकारणाचा सत्तास्पर्धेत त्यांना काही विशेष संरक्षण दिल्याशिवाय त्यांचा निभाव लागणार नाही. आणि खऱ्या अर्थाने सत्ता स्पर्धा ही निकोप होणार नाही. या पार्श्वभूमीवर भारतीय घटनेत राजकीय आरक्षणाची तरतूद करण्यात आली. या संशोधनामुळे राखीव मतदार

संघाचा विकास झाला आहे का?उमेदवाराचा निवडून आलेल्या प्रतिनिधीचा विकासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात येऊ शकेल.

**नाशिक जिल्ह्यातील विधानसभा राखीव मतदार संघ**

नाशिक जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तरेकडील महत्त्वपूर्ण जिल्ह्यांपैकी एक आहे. या जिल्ह्यात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटक आहेत. विधानसभा निवडणुकीत, राखीव मतदार संघाची रचना विशेष महत्त्वाची आहे. राखीव मतदार संघाचा उद्देश अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्गीय (OBC) व महिलांसाठी आरक्षित जागा तयार करून, त्यांना योग्य प्रतिनिधित्व देणे हा आहे.

नाशिक जिल्ह्यात असलेल्या विधानसभा राखीव मतदार संघांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना प्रतिनिधित्व मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. या जागांवर निवडून आलेले प्रतिनिधी त्यांच्या समाजाच्या कल्याणासाठी विविध योजना राबवतात.

4.प्रतिनिधींच्या राजकीय भूमिकांचा सखोल अभ्यास

राखीव मतदार संघांमधून निवडून आलेले प्रतिनिधी केवळ एक राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणूनच नाही, तर ते त्या समाजाचे नेतृत्व करणारे, लोकांच्या जीवनमान सुधारण्यासाठी कार्य करणारे नेते असतात. या प्रतिनिधींच्या राजकीय भूमिकांचा अभ्यास करतांना, आपल्याला तीन महत्त्वाच्या पैलूंचा विचार करणे आवश्यक आहे: राजकीय संघर्ष आणि विकास, प्रतिनिधींची कार्ये, आणि जातीय संघर्ष.

**दृष्टिकोन व कार्य पद्धती** :- प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधनात संशोधनाने नाशिक जिल्ह्यातील विधानसभा राखीव मतदार संघातील प्रतिनिधींच्या कार्याचा राजकीय भूमिकेचा अभ्यास केला आहे.

1. ऐतिहासिक अभ्यास पद्धती:-नाशिक जिल्ह्यातील विधानसभा राखीव मतदार संघातील प्रतिनिधींच्या कार्यांचा राजकीय भूमिकेचाअभ्यासक ऐतिहासिक राजकारणाचा सखोल अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापरकेला आहे.

2. ग्रंथालय अभ्यास पद्धती:- संशोधकाने ग्रंथालयाच्या माध्यमातून उपलब्ध होणारे राजकीय सहभागाचे संदर्भ ग्रंथालय अभ्यास पद्धती नुसार मांडले आहे.

**राजकीय संघर्ष आणि विकास**

राखीव मतदार संघांतील प्रतिनिधींचे कार्य अनेकदा राजकीय संघर्ष आणि विकासाच्या प्रयत्नांमध्ये संतुलन साधण्याचे असते. या क्षेत्रातील प्रमुख मुद्दे म्हणजे:

जातीय व समाजविघटनाचे राजकारण: राखीव मतदार संघ हे सहसा जातीय व समाजविघटनाचे राजकारण यासाठी प्रसिद्ध असतात. विशेषतः अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या क्षेत्रात, जातींच्या आधारावर मतदान होण्याची शक्यता अधिक असते. या प्रतिनिधींना आपला मतदार वर्ग सांभाळून विकासाचे प्रश्न सोडवावे लागतात, जो त्याच्या जाती, समाज, किंवा वर्गाच्या हितासाठी असतो.

उदाहरणार्थ, अशा क्षेत्रात जातीय समरसता साधण्यासाठी प्रतिनिधींनी विकासकामे आणि धोरणांची

अंमलबजावणी करतांना संप्रेषण आणि संवाद साधणे आवश्यक असते. त्यांचे मुख्य कार्य, एका बाजूला जातीयता दूर करण्याचे आणि दुसऱ्या बाजूला, त्या विशेष समुदायाला आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उंचावणे असते.

विकासाच्या योजनांची अंमलबजावणी: राखीव मतदार संघातील अनेक प्रतिनिधींना त्यांच्या क्षेत्रातील विकासकामांसाठी सरकारकडून योजना मंजूर करवून आणाव्या लागतात. या क्षेत्रांमध्ये काम करणे हे कठीण असू शकते, कारण बहुतेक वेळा निधीची आणि संसाधनांची कमतरता असू शकते. तथापि, या प्रतिनिधींचे कार्य जलसंधारण, रोजगार निर्मिती, शिक्षणाच्या उपलब्धतेसाठी होणाऱ्या योजनांची अंमलबजावणी आहे.

## निष्कर्ष

1. राखीव मतदार संघाच्या विकासात राजकीय नेतृत्वाची महत्त्वाची भूमिका आहे.

2. विधानसभेतील आरक्षित नेतृत्वाने केलेल्या विकासात्मक कार्यामुळे मतदार संघातील विकासाला गती मिळालेली दिसते..

3. नाशिक जिल्ह्यातील मतदारसंघांमधील विकासात असमतोल दिसतो.

4.राखीव मतदारसंघ व खुला मतदार संघ यांच्या साठी जो विकास कामासाठी निधी येतो त्यामध्ये विषमता दिसते.

5.राखीव मतदारसंघातील लोकप्रतिनिधींना जो निधी मिळतो तो विकास कामावर वापरला जातो.

6.अनुसूचित क्षेत्राच्या विकासासाठी राखीव मतदार संघ पूरक आहेत.

7.राखीव मतदार संघाच्या लोकप्रतिनिधींची विकासात्मक कार्याची भूमिका दिसते.

संदर्भ:-

1. डॉ. प्रा. देशपांडे प्रदीप प्रशांत प्रकाशन नागपूर.
2. महाराष्ट्र निवडणुका व निकाल करेटकर विद्या प्रकाशन .
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आठवणी.
4. स. मा. गर्गे समाज विज्ञान को समाज विज्ञान मंडळ पुणे.
5. नाईक नंदकुमार प्रशासकीय विचारवंत विद्या बुक औरंगाबाद.
6. फडके लोकसभा निवडणूक 1952 ते 1999 अक्षर प्रकाशन मुंबई पृष्ठ क्रमांक 54, 55, 57.
7. साप्ताहिके योजना नवभारत टाइम्स वर्तमानपत्रे लोकमत लोकसत्ता सकाळ गावकरी.
8. भारताचे शासन आणि राजकारण भा ल भोळे.
9. अशोककुमार दवणे भारतीय विद्युत संविधान गौरव ग्रंथ शब्द दान प्रकाशन
10. साधना पुणे दिवाळी अंक
11. राजकीय नेतृत्व डॉक्टर नारा खेडाळे मंगेश प्रकाशन नागपूर.
12. लोकराज्य मासिक महाराष्ट्र राज्य.